# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २१.०६.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**कळमणा पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २०.०६.२०२६ चे २३.४५ वा. ते २१.०६.२०२६ चे ०३.५७ वा. चे दरम्यान, शांतीनगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे **'अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम'** राबविताना अंमली पदार्थ बाळगणारे, विकणारे ईसमांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, मिळालेल्या खात्रीशिर माहितीवरून, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत, कावरापेठ, रेल्वे अंडर ब्रिजजवळ, सापळा रचून एक इसम संशयास्पदरित्या दिसून आल्याने, त्यास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्यांने त्याचे नाव पियुष उमेश नारनवरे, वय २० वर्षे रा. नविन भानेगाव, वॉर्ड नं. ०४, ता. सावनेर, जि. नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातील काळ्या बॅगमध्ये, एका प्लास्टीक पिशवीत अंमली पदार्थ गांजा एकुण ३४२ ग्रॅम वजनाचा मिळुन आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी अनिकेत उर्फ हनीभाई दोडके, वय ३० वर्षे, रा. कावरापेठ, शांतीनगर याचेकडून आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन गांजा किंमती ३,४२०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा खरेदी—विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे शांतीनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. मनोज चौधरी, पोउपनि. कुलदिप गडम, मपोउपनि. सुनिता उमिनवाडे, पोहवा. प्रविण गोरटे, दिनेश, सुमित, उमेश, शैलेष, व मपोअं. जयश्री यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २०.०६.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, एम.आय.डी.सी. पोलीसांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, मिळालेल्या माहितीवरून महेंद्रा

ट्रॅक्टर केपनीमागील, डिफेन्सकडे जाणारा रोड येथे गेले असता, त्याठिकाणी मिळालेल्या वर्णनाचा ईसम आरडा—ओरड करतांना दिसल्याने घेराव टाकून त्यास ताब्यात घेतले व निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मिथुन उर्फ तेंदुआ रामरतन भोयर, वय २५ वर्षे रा. भिमनगर, वॉर्ड नं. ०५, एम.आय.डी.सी. असे सांगितले. आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी फोल्डींग चाकू कि. २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन धूमधम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी पवन भास्कर इंजेवार, वय २९ वर्षे, रा. प्लॉट नं. २४०, सोनबानगर, वाडी, नागपूर हे हुराटेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये संचालक पदावर कार्यरत आहेत. पोलीस ठाणे राणाप्रतापनगर हद्दीत प्लॉट नं. १४७, १४८ दुसरा माळा, नेल्को सोसायटी, नागपूर येथे फिर्यादीचे कंपनीतील सेल्समध्ये कार्यरत आरोपी क्र. १) अनिरूध्द प्रकाश सिंह, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट नं. १०७, एचपी स्टेट, सोनेगाव तसेच रिलेशनशिप मॅनेजर आरोपी क्र. २) सात्वीक जैस्वाल, रा. बालाघाट (म.प्र.) यांनी संगणमत करून दिनांक ०१. ०१.२०२६ ते दिनांक ३१.०३.२०२६ चे दरम्यान, त्यांचेकडे विश्वासाने सोपविलेल्या कंपनीच्या वॉशींग किट किमती १,४१,०००/—रू. प्रति नग अशा एकुण ०८ नग कार सर्व्हिसिंग किटची चोरी करून त्याची परस्पर विक्री केली. व मिळालेल्या रकमेचा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता उपयोग करून, कंपनीची दिशाभुल करून अन्यायाने विश्वासघात करून कंपनीची एकुण ११,२८,०००/— रू. ची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे पोउपनि. लक्ष्मण ढोकळे यांनी आरोपींविरूध्द कलम ३१६(४), ३१८(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे वाडी :—** दिनांक २०.०६.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, इसम नामे रूपेश शंकर मुंडले वय ४० वर्ष रा. आनंद बुध्द विहाराजवळ, गोंडखैरी, नागपूर हे त्यांचा मित्र नामे योगेश सोनवणे याचेसह मोटरसायकलने आठवा मैल येथून गोंडखैरी येथे जात असता पोलीस ठाणे वाडी हद्दीत इंडीयन चौक, वडधामना येथील डि.एम. अड्डा समोर त्यांचे मोटरसायकल समोर अचानक डुक्कर आडवे आल्याने मोटरसायकलवरून तोल जावून खाली पडल्याने रूपेश मुंडले हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दिनांक २१.०६.२०२६ चे ०२.२५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. उत्तम जायभाये ९५५२५३८०९८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सिताबर्डी :—** मुरली दिपचंद मसराम वय ५८ वर्षे रा. गोंडी मोहल्ला, ता. केवलारी, जि. शिवणी (म.प्र.) हे त्यांचे मुलासह रेल्वे स्टेशन येथे आले होते. तेथुन बुट्टीबोरी जाण्याकरीता रेल्वे स्टेशन बाहेर गर्दीतून जात असता, दिनांक ०६.०६.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, कुठेतरी निघुन गेले. घरी परत गेले

नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ०० इंच, केस—पांढरे, दाढी— पांढरी, अंगात— निळ्या रंगाचा फुलशर्ट व कथ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात. ओळख— उजव्या हातावर 'प्रेमसिंग' नाव गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :—** स्वयंक विवेक काळे, वय २२ वर्षे रा. इंदिरा नगर, गल्ली नं. ०२, जरीपटका, नागपूर हा दिनांक १४.०६.२०२६ चे ०३.३० वा. पासून पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ८ इंच, डोळे—काळे, केस—काळे, अंगात—फुशर्ट व काळ्या रंगाचा लोअर पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो.



मुरली



स्वयंक

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**